# विशेष शाखा मिरा-भाईंदर,वसई- विरार

# पोलीस आयुक्तालय

## विशेष शाखा

टेबल क्र:- १२      पेपर कात्रण      दिनांक :- ०८/१२/२०२२

------------------०००००००------------------

विशेष शाखा मिरा-भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालय

१) मा. पोलीस आयुक्त यांचा शेरा:-

२) मा. अपर पोलीस आयुक्त यांचा शेरा:-

३) मा. पोलीस उप आयुक्त ( मुख्यालय) यांचा शेरा:-

CS CamScanner

# मिरा-भाईंदर,वसई- विरार आयुक्तालय

विषय :- दिनांक ०८/१२/२०२२ रोजीचे पेपर कात्रणाबाबत.

१) गुन्हेगारी घटना २) कायदा व सुव्यवस्था ३) राजकीय घटना ४) इतर

| अ. क्र. | दिनांक | वर्तमान पत्राचे नांव | बातमीचा मथळा (Heading) | संबंधीत पो.ठाणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | ०८/१२/२०२२ | लोकसत्ता पु. पान क्र. ३ | मालजीपाड्यात हातभट्ट्या उद्धस्त | वालीव | |
| २. | ०८/१२/२०२२ | म.टा. पान क्र. १ | पोलीसांनी न्यायालयात वर्दीतच असावे | इतर | |
| ३. | ०८/१२/२०२२ | सकाळ पान क्र. ५ | व्हेल माशाच्या उलटीसह चौघे अटकेत | नालासोपारा | |
| ४. | ०८/१२/२०२२ | सामना पान क्र. ७ | वसईच्या वासळाई ग्रामपंचायतीत महाविकास आघाडीचे तीन उमेदवार बिनविरोध | वसई | |
| ५. | ०८/१२/२०२२ | लोकसत्ता पु. पान क्र. १ | माणिकपुर पोलीस ठाण्याचे ९० टक्के काम पर्ण | माणिकपुर | |
| ६. | ०८/१२/२०२२ | पुण्यनगरी पु. पान क्र. १ | भाईंदरमध्ये भिंत पडुन कामगाराचा मृत्यु | भाईंदर | |
| ७. | ०८/१२/२०२२ | पुढारी पु. पान क्र. १ | पोलीस असल्याचे सांगुन अपहरण | पेल्हार | |
| ८. | ०८/१२/२०२२ | सकाळ पु. पान क्र. १ | मॅरेथॉन काळात वाहनांना प्रवेश बंद | वसई विरार | |
| ९. | ०८/१२/२०२२ | पुण्यनगरी पु. पान क्र. १ | महसुल बुडविणाऱ्यांवर कारवाईची मागणी | विरार | |
| १०. | ०८/१२/२०२२ | सकाळ पान क्र. १ | कानडी प्रेमाचा कळस | इतर | |

CamScanner


1) लोकसत्ता पु. पान क्र. 3

दि. 08/12/2022

# मालजीपाड्यात हातभट्ट्या उद्ध्वस्त

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** वसई पूर्वेच्या मालजीपाडा परिसरात बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या गावठी हातभट्ट्यांवर गुन्हे शाखेने संयुक्तपणे कारवाई केली. यावेळी ६ वेगवेगळ्या हातभट्ट्या उध्दवस्त करण्यात आल्या असून ३ गुन्हे दाखल करण्यात आले. गुन्हे कक्ष २ आणि अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध शाखाने ही कारवाई केली.



वसई पूर्वेच्या मालजीपाडा येथील खाडी परिसरात बेकायदा हातभट्ट्या लावून गावठी दारू तयार केली जात होती. याबाबत पोलिसांकडे तक्रारी ही करण्यात आल्या होत्या.

त्यानुसार मंगळवारी गुन्हे शाखा २ व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध शाखा यांनी विविध पथके तयार करून खाडी मार्गातून जाऊन कारवाई करण्यात आली आहे.

यात ६ ठिकाणी लावण्यात आलेल्या गावठी दारूच्या हातभट्ट्या दारू बनविण्याचे साहित्य, गावठी दारू असा ४ लाख ८१ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

कारवाईपूर्वीच आरोपी पसार झाला असल्याने अज्ञात आरोपी विरोधात वालीव पोलीस ठाण्यात तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदरची कारवाई गुन्हे शाखा २ चे पोलीस निरीक्षक शाहूराज रणवरे, सहायक पोलीस निरीक्षक सुहास कांबळे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष चौधरी यांच्या पथकाकडून करण्यात आली.

2) म.टा. पान क्र. 1

# ‘पोलिसांनी न्यायालयात वर्दीतच असावे’

**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**

‘न्यायालयात सुनावणीसाठी येताना सर्व पोलिसांनी वर्दीतच असायला हवे’, अशी समज मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी विनावर्दीत येणाऱ्या पोलिसांना दिली. वर्दीत नसल्याबद्दल पूर्वी एका पोलिस अधिकाऱ्याला दंड लावला होता, असेही यानिमित्त न्या. अजय गडकरी यांनी निदर्शनास आणले.

एका न्यायालयीन प्रकरणातील सुनावणीच्या वेळी संबंधित महिला पोलिस वर्दीत नसल्याची बाब अॅड. सुभाष झा यांनी न्या. अजय गडकरी व न्या. प्रकाश नाईक यांच्या खंडपीठाच्या निदर्शनास आणली. ती महिला पोलिस वर्दीऐवजी सलवार-कमीझमध्ये होती. ‘काही पोलिस अगदी जीन्ससह विविध प्रकारचे कपडे परिधान करून न्यायालयात येत असतात. यामुळे न्यायालयातील सभ्याचाराचे पालन होत नाही आणि एकप्रकारे त्यांच्याकडून न्यायालयाची अप्रतिष्ठा होते. हे योग्य नाही’, असे म्हणणे त्यांनी मांडले. तेव्हा, अशा बाबी तपासण्यासाठी सरकारी वकील न्यायालयात उपस्थित आहेत, अशी टिप्पणी न्या. गडकरी यांनी केली. त्यावर ‘न्यायालयात उपस्थित असलेली महिला पोलिस ही आर्थिक गुन्हे शाखेतील असून, त्यांना कायम वर्दीत असणे बंधनकारक नसते’, असे स्पष्टीकरण सरकारी वकिलांनी केले. मात्र, त्याने खंडपीठाचे समाधान झाले नाही. ‘न्यायालयात येताना सर्वच पोलिसांनी वर्दीत असणे अपेक्षित आहे. पूर्वी न्यायालयात वर्दीत नसल्याबद्दल एका पोलिस अधिकाऱ्याला दंडही लावला होता’, असे न्या. गडकरी यांनी पोलिस व वकिलांच्या निदर्शनास आणले.

3) सकाळ पान क्र.5

# व्हेल माशाच्या उलटीसह चौघे अटकेत

नालासोपारा, ता. ७ (बातमीदार) : व्हेल माशाच्या उलटीची तस्करी करून त्याची विक्री करणाऱ्या टोळीला नालासोपाऱ्यात अटक करण्यात गुन्हे कक्ष तीनच्या विरार पथकाला यश आले आहे. या टोळीतील चौघांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून ७० लाख रुपये किमतीचे ७८८ ग्रॅम वजनाची व्हेल माशाची उलटी जप्त केली आहे. या आरोपींवर तुळिंज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पोलिसांना गोपनीय माहिती

**नालासोपारा पूर्व रेल्वे स्टेशनजवळील रिजन्सी हॉटेलमध्ये एक टोळी व्हेल माशांच्या उलटीची विक्री करणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. याच माहितीवरून गुन्हे कक्ष तीन विरारचे प्रभारी पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख यांच्या नेतृत्वाखाली कारवाई करण्यात आली.**

तरुनकुमार गिरिषभाई तांडेल (वय २५), श्रावनकुमार भावेशभाई तांडेल (वय २४), उपेंनकुमार कांतीलाल तांडेल (वय २७), राधेश्याम दीनानाथ गुप्ता (वय ३५) अशी आरोपींची नावे असून, यातील तीन जण हे गुजरात राज्याच्या नौसारी जिल्ह्यातील राहणारे आहेत; तर गुप्ता हा नालासोपारा येथील राहणारा आहे. उपनिरीक्षक शिवाजी खाडे, उमेश भागवत, पोलिस हवालदार अशोक पाटील, मुकेश तटकरे, सागर बावरकर, सचिन घेरे, शंकर शिंदे, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, राकेश पवार, सुमित जाधव या पथकाने सापळा रचून रिजन्सी हॉटेलवर छापा टाकला. यात व्हेल माशाच्या उलटीसह चार आरोपींना अटक करण्यात यश मिळविले आहे.

CamScanner

4) सामना पान क्र. 7

दि. 08/12/2022

# वसईच्या वासळई ग्रामपंचायतीत महाविकास आघाडीचे तीन उमेदवार बिनविरोध


## बविआच्या तीन उमेदवारांचे अर्ज बाद

वसई, दि. ७ (सा.वा.) – ग्रामपंचायत निवडणुकीपूर्वीच वसईत बविआला झटका बसला आहे. आज झालेल्या छाननीत वासळई ग्रामपंचायतीतील बहुजन विकास आघाडीच्या तीन उमेदवारांचे अर्ज बाद झाले. त्यामुळे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व काँग्रेस या महाविकास आघाडीच्या तीन महिला उमेदवार बिनविरोध निवडून आल्या आहेत.

वासळई ग्रामपंचायतमधील प्रभाग ३ मध्ये मेटिल्डा रिचर्ड सेरेजो, लेनिका रेक्सन मच्याडो या महाविकास आघाडीच्या उमेदवार निवडून आल्या आहेत, तर प्रभाग २ मध्ये सर्वसाधारण स्त्री गटात तृप्ती चौधरी या विजयी झाल्या आहेत. बविआच्या उमेदवारांनी अर्ज भरताना सर्वसाधारण स्त्री असे न लिहिता केवळ सर्वसाधारण असे नमूद केले. शिवाय पर्यायी खूण करतानाही सर्वसाधारण यावर खूण केल्याने सदर उमेदवारांचे अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी बाद केले आहेत. या जागांसाठी पर्यायी उमेदवारही देण्यात न आल्याने महाविकास आघाडीची सरशी झाली आहे.

शिवसेना जिल्हाप्रमुख पंकज देशमुख यांचा मार्गदर्शनाने शिवसेनेचे वसई शहरप्रमुख प्रथमेश राऊत व काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ओनिल आल्मेडा यांनी या किचकट प्रक्रियेत बारीक लक्ष ठेवून प्रत्यक्ष निवडणुकीपूर्वीच तीन जागा बिनविरोध केल्या आहेत.

5) लोकसत्ता पू. पान क्र. 1



# माणिकपूर पोलीस ठाण्याचे ९० टक्के काम पूर्ण

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** मागील २६ वर्षांपासून प्रतीक्षेत असणाऱ्या माणिकपूर पोलीस ठाण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. वसईच्या अंबाडी रोड येथे नव्या पोलीस ठाण्याच्या इमारतीचें आतापर्यंत ९० टक्के काम पूर्ण झाले आहे.

माणिकपूर पोलीस ठाण्याचा कारभार हा अंबाडी रोड येथील ६ भाड्याच्या गाळ्यात सुरू आहे. वर्षभरापूर्वी अंबाडी रोड येथील वाहतूक पोलिसांच्या कार्यालयाच्या जागेत एक मजली इमारत उभारून त्याठिकाणी माणिकपूर पोलीस ठाणे तयार करण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने हाती घेतले आहे. सुमारे १८ गुंठे जागेत हे काम केले जात असून यासाठी सुमारे ९० लाखाचा निधी खर्च करण्यात येत आहे. या नव्या इमारतीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. या पोलीस ठाण्याचे जवळपास ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. जे काही काम बाकी आहे ते जानेवारी पर्यंत पूर्ण केले जाईल, असे सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता प्रशांत ठाकरे यांनी सांगितले आहे.

6) पुण्यनगरी पू. पान क्र. 1

# भाईदरमध्ये भिंत पडून कामगाराचा मृत्यू

मीरा रोड : भाईंदर पश्चिमेच्या मैदानात एका धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी भिंत बनवण्यात आली होती. ती भिंत पडून शैलेश गुप्ता (२५) या कामगाराचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही घटना सोमवारी घडली. भाईंदर पश्चिमेच्या पपैय्या मैदानात दोन दिवसांपूर्वी पूजेसाठी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी स्टेजच्या बाजूला एक भिंत बांधून एक मंदिर बनवण्यात आले होते. कार्यक्रम संपल्यानंतर भिंत तोडण्यासाठी शैलेश गुप्ता हा कामगार सोमवारी गेला होता. परंतु तो कामावरून रात्री घरी आला नाही म्हणून नातेवाईकांनी चौकशी केली. रात्री त्याचा शोध लागला नाही. दुसऱ्या दिवशी शोध घेतला असता मंगळवारी दुपारी शैलेशचा त्या भिंतीखाली मृतदेह आढळला. त्याला पाच दिवसांपूर्वी मुलगी झाली होती. त्याचा मृत्यू भिंत पडून झाला, की कोणी हत्या केली, याचा पोलिसांनी तपास करून गुन्हेगारांवर कारवाई करण्याची मागणी नातेवाईकांनी केली आहे.

7) पुढारी पू. पान क्र. 1

# पोलीस असल्याचे सांगून अपहरण

मिरारोड : पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत ४ डिसेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास मुंबई- अहमदाबाद महामार्गावरील नालासोपारा फाटा येथे तक्रारदार हे पायी चालत जात असतांना त्यांना दोन अनोळखी व्यक्तींनी थांबवुन ते पोलीस असल्याचे सांगुन त्यांच्याकडे २,००० रुपयांची मागणी केली. त्यांना त्यांचे दुचाकीवर बसवून महामार्गाने मुंबईच्या दिशेने ८ ते १० कि.मी. घेवून गेल्यानंतर मारहाण करून तक्रारदार यांच्या मोबाईलवरुन त्यांचे मित्र मो.इजराईल याला फोन करुन आम्ही पोलीस असून तुझ्या मित्राला सोडण्यासाठी २०,००० रुपये घेवून सातीवली येथे ये असे सांगुन तक्रारदार यांना मारहाण केली होती. याबाबत मोती राजेंदर राम, वय २० वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपीविरुध्द पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल होताच पेल्हार पोलीसांनी आरोपी सतिश पवार, योगेश अनिल घाडगे यांना १२ तासाचे आत गुन्ह्यात वापरलेल्या मोटार सायकलसह अटक करण्यात आली. गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि अवघडे हे करत आहेत.

CamScanner

८) सकाळ पृ. पान क्र. १ दि. ०८/१२/२०२२

# मॅरेथॉन काळात वाहनांना प्रवेश बंद

## स्पर्धेसाठी वसई-विरार महापालिका सज्ज

विरार, ता. ७ (बातमीदार) : वसई विरार महापालिका आणि वसई तालुका कला क्रीडा विकास मंडळ आयोजित १० वी वसई विरार महापालिका मॅरेथॉन स्पर्धा व इतर शालेय स्पर्धा रविवार, ११ डिसेंबरला पार पडणार आहेत. यासाठी मॅरेथॉन स्पर्धा कालावधीत स्पर्धा मार्गावर वाहनांना प्रवेश बंद करण्यात आला असल्याचे पालिकेतर्फे प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगण्यात आले आहे.

पूर्ण मॅरेथॉन स्पर्धेची सुरुवात नवीन विवा कॉलेज, विरार पश्चिम येथून, अर्ध मॅरेथॉनची सुरुवात व्हिक्टर हाईटस बिल्डिंग, वसई पश्चिम येथून; तर ११ कि.मी. पूर्ण मॅरेथॉन स्पर्धेची सुरुवात विवा कॉलेज येथून होणार असून या तिन्ही मुख्य स्पर्धा व इतर स्पर्धांचा फिनिश पॉईंट नवीन विवा कॉलेज असणार आहे. ही स्पर्धा राष्ट्रीय स्तरावरील असून मॅरेथॉन स्पर्धेच्या वेळी सकाळी ५.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत शहरातील वाहनांमुळे वाहतूक कोंडी होऊन स्पर्धकांना अडथळा निर्माण होऊ नये, याकरिता वरील स्पर्धा मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद असणार आहे. याबाबत पोलिस उपआयुक्तालयामार्फत अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच ही अधिसूचना महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे; पण या वाहतूक नियंत्रण अधिसूचनेतून फायरब्रिगेड, रुग्णवाहिका, इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने, महसूल विभाग, पोलिस विभाग, तालुका दंडाधिकारी, महापालिकेची वाहने, मॅरेथॉन स्पर्धेकरिता परवानगी दिलेली वाहने यांना वगळण्यात आले आहे.

### स्पर्धेसाठी स्पेशल ट्रेन

मॅरेथॉन स्पर्धेसाठी पश्चिम रेल्वे खास दोन गाड्या सोडणार असल्याचे महापालिकेकडून सांगण्यात आले आहे. पहिली लोकल पहाटे ३ वाजता चर्चगेट येथून सुटून ४.३५ ला विरार येथे पोहोचणार आहे; तर दुसरी लोकल पहाटे ३.३० चर्चगेटवरून सुटून ५.०५ ला विरारला पोहोचणार आहे. या दोन्ही लोकल सर्व स्थानकात थांबणार आहेत.

९) पुण्यनगरी पृ. पान क्र. १

# महसूल बुडवणाऱ्यांवर कारवाईची मागणी



**नालासोपारा :** विरारच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयाबाहेर क्यूआर कोड बनावट देऊन लाखोंचा महसूल बुडवणारी टोळी सक्रिय असल्याचे निवेदन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शिवसेना जीवदानी रोड विभागप्रमुख अजय पिंपळे यांनी प्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी प्रवीण बागडे यांना दिले. शासनाचा महसूल बुडवणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

परिवहन आयुक्तालय मुंबई यांच्या मार्फत निर्देशित परिपत्रक क्र. ४७/२०२२ च्या अनुषंगाने रिफ्लेक्टर, ट्रेड लायसन्स व क्यू आर कोडसंदर्भात काही निर्देश दिलेले आहेत. मात्र, ते नियम पायदळी तुडवून वाहनधारकांची आणि शासनाची फसवणूक करीत आहेत.

वसई विरार उपप्रादेशिक परिवहन मंडळाच्या अखत्यारीत विभागात काही दलाल, एजंट यांच्यामार्फत बोगस क्यूआर कोड व रिफ्लेक्टर यांचे वितरण होत असल्याच्या तक्रारी अजय पिंपळे यांच्याकडे आल्या. या प्रकारामुळे वाहनचालक-मालक व शासकीय महसुलाचे नुकसान होत आहे. याकडे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय वसई-विरार यांचे लक्ष वेधण्यासाठी पिंपळे यांच्या नेतृत्वाखाली उपप्रादेशिक परिवहन कार्यालय वसईचे अधिकारी प्रवीण बागडे यांना निवेदन देण्यात आले. दलालांवर त्वरित कारवाई न झाल्यास शासनाच्या बुडणाऱ्या महसुलास परिवहन अधिकारीही जबाबदार असतील, तसेच याविरोधात आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनात दिला आहे.

10) सकाळ पान क्र. 1 दि. 08/12/2022

# कानडी प्रेमाचा कळस!

## सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार आता कर्नाटक बॅंकेत

**सकाळ न्यूज नेटवर्क**

मुंबई, ता. ७ : महाराष्ट्र व कर्नाटकात सीमावाद पेटला असताना शिंदे-फडणवीस सरकारने राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन व निवृत्तिवेतन कर्नाटक बॅंकेत जमा करण्याचा निर्णय बुधवारी घेतला. वेतन, भत्ते व निवृत्तिवेतन मिळवण्यासाठी सरकारी नोकरदारांना यापुढे कर्नाटक बॅंकेत जावे लागणार आहे. सीमावादाच्या पार्श्वभूमीवर राज्यात काही ठिकाणी कर्नाटक बॅंकेच्या फलकाला काळे फासले होते. सरकारच्या या निर्णयावरून आता नवा वाद पेटण्याची शक्यता आहे.

राज्य सरकारने कर्नाटक बॅंकेशी नुकताच करार केला असून अर्थ विभागाने तसा शासन निर्णय आज जाहीर केला. सरकार ३८ विभागांच्या योजनांसाठी सरकारी तसेच मान्यताप्राप्त खासगी बॅंकेत खाते उघडण्याची अनुमती देते. राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते व निवृत्तिवेतनाच्या नियोजनासाठी बॅंकांना सरकारशी करार करावे लागतात. कर्नाटक बॅंकेने नुकताच राज्य सरकारशी करार केला आहे. त्यामुळे आहरण व संवितरण अधिकारी यांचे वेतनासाठीचे सरकारचे खाते कर्नाटक बॅंकेत उघडले जाणार आहे. वेतन व भत्ते यांच्या नियोजनासाठी राज्य सरकारने सुचविलेल्या १५ बॅंका पूर्वी होत्या. आता कर्नाटक बॅंक, जम्मू व कश्मीर बॅंक आणि उत्कर्ष स्मॉल फायनान्स बॅंक अशा तीन बॅंकांचा समावेश झाला आहे.

» संबंधित वृत्त २, ४




• पनवेल

### दिवसभरात...

- **सांगली :** कर्नाटक सीमेवर तणाव अजून कायम
- **बेळगाव :** महाराष्ट्र-कर्नाटक आंतरराज्य बससेवा ठप्प. बसस्थानकावर कडक पोलिस बंदोबस्त.
- **बेळगाव :** राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी साधला म. ए. समिती पदाधिकाऱ्यांशी संवाद.
- **औरंगाबाद :** औरंगाबादेत कर्नाटकातील बस तसेच कर्नाटक बॅंकेच्या शाखा फलकाला काळे फासण्यात आले.
- **सोलापूर :** कर्नाटकात जाण्याचा ठराव करणाऱ्या ग्रामपंचायतीवर कारवाई
- **पनवेल :** पनवेल शहरामध्ये मनसैनिकांकडून कर्नाटक राज्यातील वाहनांना काळे फासले.

मागील दहा दिवसांपासून महाराष्ट्राच्या विरुद्ध षड्यंत्र सुरू असून कर्नाटकचे मुख्यमंत्री बेताल विधाने करत आहेत. महाराष्ट्र तोडण्याची भाषा केली जात आहे. कर्नाटक आणि महाराष्ट्र दोन्ही ठिकाणी भाजपची सत्ता असून महाराष्ट्रातील जनतेला मारहाण झाली आहे.

**- सुप्रिया सुळे,** खासदार, राष्ट्रवादी कॉंग्रेस

### शहांच्या उपस्थितीत सीमाप्रश्नी आज बैठक

बेळगाव : महाराष्ट्र-कर्नाटक सीमा वादाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी उद्या (ता.८) दुपारी १२ वाजून ४० मिनिटांनी महाराष्ट्रातील सर्वपक्षीय खासदारांची बैठक बोलावली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा सीमाप्रश्नाला चालना मिळणार आहे. ही बैठक बोलवल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.

## कर्नाटकला समज द्या : मुख्यमंत्री

मुंबई : महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद पुन्हा पेटलेला असताना आज पुन्हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासमवेत संवाद साधला.

महाराष्ट्राने संयमी भूमिका घेतली असतानाही कर्नाटक सरकार दोन्ही राज्यात वाद उफाळेल, अशी चिथावणीखोर भाषा आणि कृत्य करत असल्याची नाराजी शिंदे व फडणवीस यांनी अमित शहांकडे व्यक्त केली. महाराष्ट्राच्या वाहनांवर हल्ले सुरू आहेत. या प्रकरणी आपण लक्ष घालून कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना योग्य ती समज आणि निर्देश द्यावेत, अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहा यांच्याकडे केली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा केल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

दोन राज्यात अशा प्रकारचे वातावरण असू नये. कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांशी झालेला संवादसुद्धा त्यांच्या कानावर घातला आहे. तेथील मुख्यमंत्र्यांनी मला आश्वासित केले आहेच. पण, तरी त्यांनीही कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना स्पष्टपणे सांगावे, अशी विनंती शहा यांना केली आहे. त्यावर शहा यांनी लक्ष घालण्याचे आश्वासन दिले आहे.

**- देवेंद्र फडणवीस,** उपमुख्यमंत्री

CamScanner